अहमदनगर महानगरपालिका.
नगरसचिव विभाग
जा.क्र.          दि.    /०४/२०१०

प्रति,
मा.सभापती ,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

सादर,

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२९ दिनांक ३१/०३/२०१० अन्वये शहर वाहतुक बससेवा महाराष्ट्र दिनी १ मे रोजी सुरू करणेत यावी असा ठराव झालेला आहे.

यास्तव मा.आयुक्त यांनी दि.२७/४/२०१० रोजी सदरचा विषय प्राधान्याने घेणे आवश्यक आहे. असे इकडे कळविलेले आहे.

तरी सदरचा विषय तात्काळ घेणे करीता मा.स्थायी समितीची विशेष सभा बोलविणे कामी तारीख व वेळ मिळणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक :- ०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २८/०४/२०१०

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम३ (क)अन्वये** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **विशेष सभा क्र.०५ गुरूवार दि.२९ /०४/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार दिनांक- २९ /०४/२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| २१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी बससेवे बाबतच्या अटी / शर्ती चे मसुदयास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** :- विषय क्रमांक २१ चे प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- २१ गुरूवार दिनांक २९/४/२०१०

ठराव क्रमांक- २१ गुरूवार दिनांक २९/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी बससेवे बाबतच्या अटी / शर्ती चे मसुदयास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मो.व्हे. विभाग / दि.०५/०४/२०१०

**<u>विषय</u>**- अहमदनगर महानगरपालिका अभिकर्ता संस्था नेमून शहर बससेवा सुरू करणेकामी अटी / शर्तीनुसार करारनामा करून घेणेबाबत.

**<u>संदर्भ</u> -** मा.स्थायी समिती ठराव क्र. १२९ दिनांक- ३१/०३/२०१०

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने अभिकर्ता संस्था नेमून शहर बससेवा सुरू करणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.३१ दि.२८/७/०९ अन्वये नेमलेल्या अभ्यास समितीचा अहवाल व प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सांगोपांग विचार विनीमय करून पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत आलेला आहे.

**१]** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणेकामी प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. पुणे यांची अभिकर्ता संस्था म्हणून नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

**२]** अहमदनगर महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे सल्ल्याने अहमदनगर शहर वाहतुक बससेवेच्या अटी / शर्ती तयार करणेत येवून त्या मा. स्थायी समिती सभेकडेस मंजूरीसाठी सादर करण्यांत याव्यात. अभिकर्ता संस्थेशी करारनामा करून बससेवा सुरू करणेकामी आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येवून महाराष्ट्र दिनी १ मे रोजी बससेवा सुरू करणेत यावी. नामंजूर निविदाकार यांची टेंडर बयाणा रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. असा मा.स्थायी समिती ठराव क्र. १२९ दिनांक ३१/०३/१० अन्वये ठराव पारीत झालेला आहे.

सदरचे ठरावानुसार बससेवेबाबतच्या अटी / शर्ती महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे सल्लानुसार तयार करण्यांत आलेल्या आहेत. बससेवेबाबतच्या तयार करण्यांत आलेल्या अटी शर्ती मंजूरीसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेवणेकामी रिपोर्ट सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.१२/४/२०१०

अंतर्गत लेखा परिक्षक :- मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचे प्रस्तावाप्रमाणे बससेवेच्या अटी व शर्ती मंजुरीसाठी निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यांस हरकत नाही.

मुख्य लेखा अधिकारी :- सादर, सदर प्रस्तावाप्रमाणे अहवाल मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त (कर) साहेब :- सहमती दर्शक सही

म.न.पा.विधी सल्लागार :- सविनय सादर, काही किरकोळ दुरूस्ती करारनाम्यामध्ये करणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार दुरूस्ती करणे गरजेचे आहे.

मोटर व्हे. वि. प्रमुख :- मा.फेर सादर मनपाचे विधी सल्लागार यांचे सूचनेनुसार किरकोळ दुरूस्त्या सुधारित करण्यात आलेल्या असून,सुधारित करारनाम्याचा मसुदा सोबत जोडला आहे.

तरी मा.स्थायी समिती ठराव क्र.१२९ दि.३१/३/१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार तयार करण्यांत आलेल्या करारनामा अटी शर्ती, मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ तसेच मंजुरीसाठी सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२७/४/२०१०

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये)

# करारनामा

करार लिहून देणार

**प्रसन्ना ट्रव्हल्स प्रा.लिमिटेड, पुणे**

( मालकाचे किंवा भागीदारांची नांवे )

करारनामा लिहून घेणार

मा.आयुक्त

अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर

**--**--**

**१) व्याख्या-**

या दस्तऐवजास, प्रत्यक्ष अटी व शर्तीत अन्यथा तरतूद केली नसेल त्यावेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार अर्थ अपेक्षित असेल.

**२) योजना -**

अहमदनगर महानगरपालिकेने शहर हद्दीत व हद्दीबाहेर शहर वासियांच्या सोईसाठी बांधा, वापरा व मालकी (B.O.O.) या तत्वावर परिवहन सेवा सुरू करण्यास मंजूरी दिली असून नियुक्त केलेल्या अभिकर्त्यास ही सेवा १० वर्षापर्यंत चालविणेस देण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये नियुक्त अभिकर्त्यास स्थायी समितीने ठरवून दिलेल्या मार्गाने व ठरावाप्रमाणे बसेसच्या उचीत फे-या निश्चित करून स्वखर्चाने कमीत कमी ३० सीटच्या नामांकित कंपनीच्या बसेस खरेदी करणे बंधनकारक राहिल.

ही बससेवा "अहमदनगर महानगरपालिका परिवहन बससेवा" म्हणून संबोधण्यात येईल. ए.एम.टी.(AMT) हे सिम्बॉल म्हणून वापरण्यात येईल.

बसेसवर परिवहन व्यवस्था चालविणारी संस्था म्हणून अभिकर्ता संस्थेचे नाव अथवा लोगो वापरण्यास महानगरपालिकेची परवानगी राहिल.

मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, शासनाच्या परिपत्रकानुसार व कलर कोड नुसार बसेसला कलर दिला जाईल. मोटार वाहन कायद्याच्या तरतूदीनुसार रंगसंगती, दरवाजे, खिडक्यांची मोजमापे, आकार, आसन क्षमता, रचना इत्यादीमध्ये असणे बंधनकारक राहिल.

आकर्षकता व उपयुक्तता याबाबत अभिकर्त्यास बदल करणे असल्यास मा.प्रादेशिक परिवहन अधिका-यांच्या परवानगी नंतर करता येईल. शहर टप्पा प्रवासी वाहतूक परवान्यासाठी बसेसची नोंदणी मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांनी ठरविल्यानुसार अभिकर्त्यास करावी लागेल.

**३) करारनाम्याचा कालावधी-**

हा परिवहन उपक्रम १० वर्षापर्यंत कार्यरत राहिल.

कराराच्या कालावधीमध्ये अन्य बससेवांना अहमदनगर महानगरपालिका परवानगी देवू शकणार नाही.

मात्र करारनाम्यात काही तरतूद असली तरी अटी व शर्तीचे उल्लघंन अथवा कोणत्याही कारणास्तव करार संपुष्टात आणला गेल्यास महानगरपालिका या कारणासाठी अन्य अभिकर्ता नियुक्त करू शकेल. व तसा अधिकार महानगरपालिकेस असेल.

**४) स्वामित्वधन / रॉयल्टी -**

शहर परिवहन बससेवा ही शहरासाठी आवश्यक सेवा आहे. या धोरणानुसार या सेवेतून जास्तीचे उत्पन्न महानगरपालिकेस अपेक्षित नाही. नागरिकांना ही सेवा पुरविणे हे कर्तव्य समजून स्वामित्वधनापोटी महानगरपालिकेने नाममात्र रक्कम आकारण्याचे ठरविले आहे. करिता अभिकर्त्याने महानगरपालिकेस रू.६००१/- प्रति बस प्रति महिना द्यावेत.

**५) बयाणा रक्कम व सुरक्षा रक्कम -**

अभिकर्ता संस्थेने बयाणा रक्कम म्हणून रू.५०,०००/- चा डी.डी./ पे - ऑर्डर (राष्ट्रीयकृत बँकेचे) महानगरपालिकेच्या नावाने देणे बंधनकारक राहिल. अभिकर्ता बससेवेची उचित पूर्तता करण्यास असमर्थ ठरल्यास बयाणा रक्कम जप्त केली जाईल.

अटी शर्ती मंजूर झाल्यानंतर अभिकर्त्यास रू.२५.०० लाख एवढी रक्कम बँक गँरटीच्या स्वरूपात सुरक्षा रक्कम म्हणून बससेवा संपेपर्यंत महानगरपालिकेकडे ठेवावी लागेल. सदर बँक गँरटीची मुदत वाढवून घेण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल. अभिकर्त्याच्या चुकीमुळे कोणतेही निर्माण झालेले दायित्व अदा करणेसाठी ही सुरक्षा रक्कम वापरली जाईल. अशा वेळी सुरक्षा रक्कमेची बँक गँरटी १५ दिवसाच्या आत पुर्ववत करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

**६) प्रवासासाठी प्रवासी भाडे दर**

अभिकर्त्याने बससेवा सुरू केल्यानंतर मा.स्थायी समितीच्या मंजूरीने व मा. राज्यशासनाच्या दरपत्रकाच्या निर्देशानुसार किमान व कमाल दर मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिक यांचे मंजूरीने तिकीट दर लावणे त्यास बंधनकारक राहील.

प्रवासी भाडयामध्ये नियमाप्रमाणे मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिक तसेच मा.स्थायी समिती यांच्या मंजूरीनुसारच फेरबदल करता येतील.

शासन नियमाप्रमाणे विद्यार्थी अंध ,अपंग यांना सवलतीचे दर व मासिक पास देणे बंधनकारक राहिल. याबाबत कुठल्याही स्वरूपाचा परतावा महानगरपालिकेकडून अभिकर्त्यास दिला जाणार नाही.

शासकीय नियमानुसार अनुज्ञेय व्यक्तींसाठी बसेसमध्ये आसन आरक्षित ठेवणे अभिकर्त्यास बंधनकारक राहिल.

शहर बस वाहतूकीच्या बसमधून विना तिकीट प्रवास करणा-या प्रवाश्याकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे अधिकार अभिकर्ता यांना राहतील.

**७) बसेस उपलब्ध करून देण्याची रित**

मोटार वाहन कायदा कलम २ (४२) अन्वये शहर बस वाहतूक उपक्रम हा महानगरपालिकेच्या नावे असल्याने बसेसची खरेदी अभिकर्त्याची स्वखर्चाची असून सुध्दा बसेस या महानगरपालिकेच्या नावाने असतील.

अभिकर्त्यास स्वतच्या नावाने सेवा सुरू करतांना नविन १५ ते ३० बसेस खरेदी करून सेवेत रूजू करणे आवश्यक राहिल. आवश्यकतेनुसार मा.स्थायी समितीच्या पुर्व परवानगी नुसार बसेसची संख्या वाढविण्यात येईल.

बसेसची आसन क्षमता किमान ३० सीटची असावी.

बसेसकरिता अभिकर्ता संस्थेने घेतलेल्या बँक कर्जाचा व महानगरपालिकेचा कोणताही संबंध असणार नाही. आर्थिक नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी अभिकर्ता जबाबदार राहिल. अहमदनगर महानगरपालिका त्यास कोणत्याही स्वरूपात जबाबदार राहणार नाही.

बँक कर्जामुळे, व अन्य काहीही कारणामुळे बँकेने वाहने ताब्यात मागितल्यास वाहने बँकेच्या ताब्यात देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहिल.

महानगरपालिकेस आर्थिक नुकसान आल्यास ही नुकसान भरपाई सदर संस्थेच्या/ सभासदाच्या स्थावर जंगम मालमत्तेतुन वसूल केली जाईल.

शहर बस वाहतूक उपक्रमाचा करार संपल्यानंतर किंवा कर्ज फेड झाल्यानंतर किंवा काही कारणास्तव करार संपुष्टात आल्यास सदर वाहने संबधित सदर संस्थेला आहे त्या स्थितीत परत करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहिल.

सदरचा उपक्रम महानगरपालिकेच्या वतीने राबविण्याचा असल्याने प्रत्येक महिन्याला महानगरपालिकेचे लेखापरिक्षक किंवा इतर अधिकारी यांचे तपासणी कामी लागणारे रिपोर्ट, कागदपत्रे अभिकर्ता संस्था महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यास बांधील राहिल.

बसेसवर खाजगी जाहिराती करण्यास अभिकर्त्यास परवानगी असेल. मात्र नामफलक बोर्डावर काहीही परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. जाहिरातीचे दर निश्चित करावेत.

बसेस कायमस्वरूपी सुसज्ज व सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.

जाहिरात करापोटीचे उत्पन्न महानगरपालिकेस व जाहिराती पासून मिळणारे उत्पन्न अभिकर्त्याचे राहिल.

मा.प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या परवाना मंजूरीप्रमाणे बसेसच्या नोंदणी बुकावर महानगरपालिकेची मालकी असली तरी बसेस बाबतीत महत्वाचा निर्णय घेताना संस्थेशी व संस्थेने कर्ज घेतलेल्या बँकेशी विचार विनिमय करून निर्णय घेण्यात येईल. परंतू याबाबतीत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहिल.

**८) एकत्रित बँक खाते - (Escrow Account)**

हा उपक्रम महानगरपालिकेच्या मालकी स्वरूपात राबविणे कामी अभिकर्ता संस्था व महानगरपालिका यांचे एकत्रित बँक खाते "अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम निधी " या नावाने असेल. अहमदनगर महानगरपालिकेत प्राधिकृत अधिकारी व अभिकर्ता यांचे स्वाक्षरीने सदर खाते कार्यान्वित राहिल.

अभिकर्ता संस्थेला या सेवेपोटी मिळणा-या उत्पन्नाचा दैंनदिन भरणा सदरच्या खात्यामध्ये करावा लागेल. दैंनदिन मिळणारे उत्पन्न दुस-या दिवशी या खात्यात जमा करणे अभिकर्त्याला बंधनकारक राहिल.

दर आठ दिवसांनी लेखापरिक्षक/ मा.आयुक्त यांनी नियुक्त केलेले अधिकारी यांचेकडून बँक खात्यातील रक्कमेची तपासणी होवून एकत्रित बँक निधीतून प्रथमतः बँक कर्ज हप्ता, शासकीय कर, कर्मचा-यांचे पगार, महानगरपालिका रॉयल्टी, यांची कपात होवून उर्वरीत रक्कम अभिकर्ता संस्थेला इतर बाबींसाठी वापरता येईल.

**९) परिवहन सेवेसाठी लागणारा कर्मचारी वर्ग वाहक / चालक इत्यादी -**

ही परिवहन सेवा निरंतर चालू राहणेसाठी अभिकर्ता स्वत:चा कर्मचारी वर्ग वाहक/ चालक इत्यादी ठेवेल. या सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते किंवा मेहनताना देण्याची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्त्याची राहिल. या कर्मचा-यांचा महानगरपालिकेशी काहीही संबंध असणार नाही. तसेच नियुक्त कर्मचारी वर्गास महानगरपालिका आस्थापनाशी कोणताही संबध असणार नाही. त्यांना शासकीय किंवा म.न.पा.कर्मचा-यांच्या सोयी सुविधा देण्याचे महानगरपालिकेवर बंधन असणार नाही.

या सेवेसाठी कर्मचारी व अभिकर्ता यांचेमध्ये अभिकर्ता हे मालक तर कर्मचारी हे नोकर अशा प्रकारचे हितसंबध राहतील.

कोणत्याही कारणामुळे संबधित कर्मचा-यांच्या कोणत्याही रक्कमा देय असल्यास ती देण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.

परिवहन सेवेतील कर्मचारी व वाहक चालकावर पर्यवेक्षण व नियत्रंण ठेवण्याची जबाबदारी अभिकर्त्यावर राहिल. परंतू महानगरपालिका प्रशासनाने कर्मचा-यांच्या काही तक्रारी व सुचना केल्यास त्याची अभिकर्त्याकडून दखल घेतली जाईल. या कर्मचा-यांचा किंवा इतर कर्मचारी युनियनशी महानगरपालिका पदाधिका-याने अथवा अधिका-याने अथवा कर्मचारी युनियनने याबाबत चर्चा, पत्रव्यवहार व मिटींग करू नये अथवा कोणत्याही सुचना करू नयेत. याबाबत अभिकर्त्यांनी महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिल्यास संबधित व्यक्तीवर कार्यवाही करण्यात येईल याची महानगरपालिकेतर्फे हमी असणार आहे.

**१०) अपघात -**

अभिकर्त्यास नियमानुसार वेळेत सर्व बसेसचा विमा उतरविणे बंधनकारक राहिल. सेवा कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचा अपघात घडल्यास, कर्मचारी अथवा प्रवासी अथवा कोणाचेही कोणतेही रक्कम देय असल्यास किंवा नुकसान भरपाई देणे बाबत आदेश झाल्यास त्या सर्व रक्कमेचे दायित्व अभिकर्ता यांचेच असेल. सदर रक्कम अभिकर्ता त्यांचे स्तरावर विमा कंपनी मार्फत देखील देउ शकेल. याबाबत महानगरपालिकेस कोणतेही प्रतिपूर्ती अनुज्ञेय असणार नाही.

**११) दंगल, संप, अथवा आत्पकालीन परिस्थिती -**

बससेवा सुरळीत ठेवणेसाठी महानगरपालिका सर्वतोपरी सहकार्य करेल. मात्र या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारे हानी नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. सदर काळात पोलीस संरक्षण मिळून देणे बाबत महानगरपालिका सहकार्य करेल. तथापी सरंक्षणाबाबतची रक्कम अभिकर्ता संस्थेस द्यावी लागेल.

संप,दंगल,नैसर्गिक आपत्ती, अन्यथा कोणत्याही कारणासाठी जर ही सेवा बंद राहिली तर अभिकर्त्यास त्याच्या होणा-या नुकसान भरपाईसाठी मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधीन राहून कराराच्या मुदतीत वाढ करण्याबाबत विचार करण्यात येईल. मात्र त्याबाबत कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही.

**१२) बससेवेतील मार्ग** -

शहरातील बससेवा सुरू करताना अभिकर्त्यास महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मार्गावर व ठरवून दिलेल्या फे-याप्रमाणे काम करावे लागेल.

परंतू गरजेप्रमाणे अभिकर्त्याला वेळोवेळी यामध्ये बदल करणे अथवा नविन मार्ग चालू करणे. फे-यांची संख्या कमी जास्त करणे असल्यास याबाबत महानगरपालिकेची पुर्व परवानगी मा.आयुक्त स्तरावर घेणे अभिकर्त्यास बंधनकारक राहिल.

या सर्व बस मार्गावर /सर्व बस थांब्यावर बसेस थांबविणे बाबत अभिकर्ता दक्षता घेईल.

बस मार्गांची महानगरपालिका व्यतिरिक्त अन्य खात्यांची उचित परवानगी अथवा मान्यता आवश्यक असल्यास ती घेणेची जबाबदारी संयुक्तीक राहिल.

**१३) वाहनतळ / ऑफिस / वर्कशॉप**

अभिकर्ता संस्था यांना वाहनतळ, वर्कशॉप, ऑफिस, इत्यादी करिता खुली जागा उपलब्धतेनुसार महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. याकरिता महानगरपालिका ठरवेल असे नाममात्र भाडे अभिकर्ता संस्थेस द्यावे लागेल.

अशा जागेवर महानगरपालिकेमार्फत कोणतेही कायमस्वरूपी अथवा तात्पुरते स्वरूपाचे बांधकाम, शेड इत्यादी करून दिले जाणार नाही. अभिकर्त्यास या जागांवर कायमस्वरूपी बांधकाम करता येणार नाही. परंतू तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम महानगरपालिका परवानगी नुसार करता येईल.

या जागेचा इतर व्यावसायिक वापर अभिकर्त्यास करता येणार नाही.

**१४) तिकीटे व स्टेशनरी छपाई -**

स्टेज निहाय मंजूर दराप्रमाणे तिकीटाची उपलब्धता अभिकर्त्याने स्वतः करावयाची आहे. तसेच स्टेशनरी, इत्यादी छपाई संबधित अभिकर्ता संस्थेला स्वखर्चाने करावी लागेल.

बसेसच्या तिकीटावर महानगरपालिके ने कळविल्यानुसार महानगरपालिकेची ध्येय धोरणे, जाहिराती इत्यादी छापावे लागेल.

तिकीट दरापेक्षा अधिक रक्कम वाहतूकीसाठी घेता येणार नाही. चौकशी अंती असे सिध्द झाल्यास संबधित संस्थेच्या उत्पन्नातून कपात करून घेतली जाईल याबाबत अंतीम निर्णय महानगरपालिका आयुक्त यांचा राहिल.

संबधित संस्था/ फर्म यांनी अहमदनगर महानगरपालिका यांना दैंनदिन तिकीट विक्री माध्यमातून झालेल्या एकूण उत्पन्नाच्या दैंनंदिन तपशिल प्रति आठवडा अहमदनगर महानगरपालिकेकडून तपासला जाईल.

**१५) अन्य शासकीय कर व इतर देयका बाबत.**

मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत सर्व नियम पाळण्याची व कर भरण्याची जबाबदारी अभिकर्ता संस्थेची राहिल.

उपलब्ध नियमातील तरतूदीनुसार वेळावेळी आवश्यक असणा-या शासकीय व निमशासकीय करांचा भरणा नमूद केलेल्या मुदतीमध्ये संबधित संस्था करेल. या संबधात कोणताही विलंब अथवा दंड झाल्यास दंडात्मक कार्यवाहीचे व आर्थिक नुकसानीचे दायित्व अभिकर्ता संस्थेचे राहिल.

याबाबत महानगरपालिका जे निर्देश देतील त्याप्रमाणे कार्यवाही करणे संबधित अभिकर्ता यांचेवर बंधनकारक राहिल.

बससेवे बाबत लागणारे इंधन व स्पेअरपार्ट, कर्मचारी वेतन, भविष्य निर्वाह निधी याबाबत सर्व संबधित एजन्सीने अभिकर्ता संस्थेशीच पत्रव्यवहार करणे बंधनकारक राहिल. यात महानगरपालिकेचा हस्तक्षेप राहणार नाही.

**१६) नियंत्रण -**

अटी शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे या सर्व परिवहन उपक्रमा बाबत महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे नियत्रंण राहिल. मात्र महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतूदीनुसार परिवहन समिती गठीत केल्यास बस सेवा परिवहन उपक्रमा वर परिवहन समितीचे नियत्रंण राहिल.

बस सेवे संदर्भातील अभिलेखे, नेमून दिलेल्या मार्गस्थ गाडीचे तिकीटे इत्यादी बाबी कोणत्याही वेळेस तपासण्याचे अधिकार मा.आयुक्त अथवा त्यांन प्राधिकृत केलेले अधिकारी अथवा त्यांचे कर्मचारी यांना राहतील ते उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.

अभिकर्त्यास मा.आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे निर्देश व पर्यवेक्षणास अधीन राहून काम करावे लागेल.

**१७) सेवेतील कर्मचा-यावर नियंत्रण -**

परिवहन सेवेतील कर्मचारी यावर अभिकर्ता संस्थेचे नियंत्रण असेल परंतू बससेवा कर्मचा-यांच्या गैरवर्तना बाबत महानगरपालिका अभिकर्ता संस्थेस निर्देश देवू शकेल. या निर्देशाचे अनुपालन करणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहिल. बससेवेतील सर्व प्रकारचे कर्मचा-यांना युनिफॉर्म व आयकार्ड देणे अभिकर्ता संस्थेस बंधनकारक राहिल.

**१८) करारनाम्याची रित -**

अभिकर्त्याने त्यांना कळविल्यानंतर १५ दिवसाच्या आत रू.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

शासनाच्या नियमानुसार अन्य कोणतेही स्टॅम्प डयुटी अन्य कराने देय होत असल्यास अतिरिक्त खर्चाची जबाबदारी अभिकर्ता यांची राहिल. सदर करारनाम्याचा कालवधी १० वर्षाचा राहिल.

**१९) करारनामा समाप्त करणे -**

अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम१९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८अन्वये संबधित अधिनियमांचे अटी शर्तीचे उल्लघंन केल्यास संबधित अभिकर्त्यास एक महिन्याची आगावू नोटीस देण्यात येईल. यानंतरही कोणतेही सुधारणा न झाल्यास ही सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणणेबाबतचा अधिकार मा.आयुक्त यांचा असेल मा.आयुक्त यांचे निर्णया विरूध्द अभिकर्त्यास १५ दिवसाच्या आत मा.स्थायी समितीकडे अपील करता येईल.

मात्र या अपीलावरील मा. स्थायी समितीचा निर्णय अंतीम असेल.

**२०) लवाद -**

पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ यांचेमध्ये काही वाद विवाद निर्माण झाल्यास व सदरहू वाद विवाद चर्चा अंती निकाली न निघाल्यास याबाबत मा.सचिव, नगर विकास विभाग यांचेकडे दाद मागता येईल.

**२१) दंडनिय आकार -**

कोणत्याही नैसर्गिक कारणाशिवाय बससेवा बंद ठेवल्यास या कालावधीसाठी महानगरपालिकेचे भाडे/ स्वामित्वधन चालू राहिल. तसेच दंडनिय रक्कम म्हणून रू.१०००/- प्रति दिन आकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचा राहिल. व हे अभिकर्त्यास बंधनकारक राहिल.

**२२) न्याय व्यवस्था -**

वरील कोणत्याही निर्णयाविरूध्द न्यायलयीन दाद मागावयाची असल्यास अभिकर्त्यास प्रथम अहमदनगर जिल्हा न्यायालयामध्ये दाद मागता येईल.

पक्ष क्रमांक २ — पक्ष क्रमांक १

प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. — आयुक्त<br>अहमदनगर महानगरपालिका

साक्षीदार

१) ........................................................

२) ........................................................

--**--

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी बससेवेच्या अटी / शर्तीचे मसुदयास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.)श्री. हांगे साहेब :-ऑफिस रिपोर्ट व अटी / शर्ती मा. सभागृहास वाचून दाखवाव्यात त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट व बससेवेचे अटी/शर्ती सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आल्या.

मा.श्री.पवार बा.रे.:- बसेस वर परिवहन व्यवस्था चालविणारी संस्था म्हणून अभिकर्ता संस्थेचे नांव अथवा लोगो वापरण्यांस महानगरपालिकेची परवानगी घेण्यांत यावी.अशाबाबत अट टाकण्यांत यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- महानगरपालिकेची बससेवा म्हणून महानगरपालिकेचे नांव बसेसवर राहिल संचालक म्हणून सदर अभिकर्ता संस्थेचे नांव, लोगे बसेसवर लवील त्यास महानगरपालिकेची परवानगी असेल सदर संस्थेचे नांव अथवा लोगो यांचा आकार ठरवावा. प्रसन्ना ट्रॅव्हल्स म्हणून अभिकर्ता नांव लावेल.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- लोगोचा आकार मा.सभेने ठरवावा बसच्या चारही बाजूस तो लाउ शकेल.

मा श्री. पवार बा.रे. **व** मा.श्री. भोसले ग.पुं. :- महानगरपालिकेचे नांवापेक्षा सदर संस्थेचा लोगो अथवा नांव हे २५% असावे

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे नांवापेक्षा अभिकर्ता संस्थेचा लोगे अथवा नांव हे २५% इतके लहान असावे (४-१ प्रमाणात असावे)

मा.श्री. लोंढे शि.बा.:- हा परिवहन उपक्रम १० वर्षापर्यत कार्यरत राहिल अशी अट आहे त्या ऐवजी पांच वर्ष कालावधी ठरवावा.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा.स्थायी समिती सभेने ठराव मंजूर करून बससेवेची मुदत दहा वर्षे केलेली असल्याने आता त्यामध्ये बदल करता येणार नाही.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- मुदती बाबत चुक झाली आहे. चुकीची दुरूस्ती करावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- तसे करता येणार नाही.

मा.श्री. पवार बा.रे.:- अभिकर्ता संस्था किती बस चालू करणार त्याची अट आहे का ?

मा.सभापती साहेब :- १५ ते ३० बसेस घेवुन बससेवा सुरू करणे बाबत अट आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- त्यांचेकडून १५ बसेस साठी रूपये एक्कवन्न हजार व पुढील प्रत्येक बससाठी रूपये दोन हजार प्रमाणे रॉयल्टी घेण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- स्वामित्वधन / रॉयल्टी म्हणून नाममात्र दर आकारणेचे ठरले असल्याने त्यांनी कितीही बस सुरू केल्या तरी ही त्यांचेकडून रूपये एक्कावन्न हजार स्वामित्वधन / रॉयल्टी म्हणून घेण्यात यावेत.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- सदर संस्थे कडून बयाणा रक्कम पन्नास हजार व बँन्क गॅरंटीची रक्कम पंचवीस लाख ऐवजी पन्नास लाख अशी करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- बॅन्क गॅरंटी पन्नास लाख करण्यांत यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- नागरिकांना सेवा पुरविणे हे महत्वाचे असून तसे आपले धोरण असल्याने बॅन्क गॅरन्टी वाढवू नये.

मा.श्री. कांबळे र.द. :- परिवहन सेवेतील कर्मचा-यांची कुठल्याही प्रकारची देय्य रक्कम ही बॅन्क गॅरंटीचे रकमे मधून कपात करून दिली जाणार नाही ही अट नमुद करावी.

मा.सभापती साहेब :- बयाना रक्कम रूपये पन्नास हजार ऐवजी रूपये एक लाख व बॅन्क गॅरंटी रूपये पंचवीस लाख ऐवजी रूपये पन्नास लाख घेण्यांत यावी. कर्मचारी यांचे वेतनाची अगर इतर कुठल्याही प्रकरची देय्य रक्कम ही बँन्क गॅरंटी मधून कपात करून दिली जाणार नाही. कर्मचा-यांचे वेतनाची जबाबदारी अभिकर्ता संस्थेची राहिल.

मा.श्री.बारस्कर पो.ज. :- बसेसवर खाजगी जाहिराती करण्यांस अभिकर्त्यास परवानगी असलेने महानगरपालिकेचे नावाचे बोर्डावर काहीही परिणाम होणार नाही याची दक्षता अभिकर्ता संस्थेने घ्यावी. जाहिरातीचे दर निश्चीत करावेत. महानगरपालिकेची जाहिरात असेल तर ती विनामुल्य प्रदर्शीत करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेची जाहिरात विनामुल्य असेल असा अटी / शर्ती मध्ये समावेश करावा.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- बससेवेचे चालक व वाहक कर्मचा-यांचे चारित्र्य चांगले असलेबाबत प्रमाणपत्र आवश्यक करावे.

मा.श्री. पवार बा. रे. :- परिवहन सेवेसाठी लागणारा वाहक / चालक कर्मचारी वर्ग यांचेसाठी वाहक चालक यांचा आर.टी.ओ. कडील परवाना बंधन कारक करावा.

मा.सभापती साहेब :- परिवहन सेवेतील वाहक,चालक यांना आर.टी.ओ. कडील वाहक चालक परवाना बंधनकारक राहिल अशी अट टाकावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- सेवा कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारचा अपघात घडल्यास कर्मचारी अथवा प्रवासी, अथवा कोणाचेही कोणतेही देय, असल्यास, नुकसान भरपाई देणे बाबत आदेश झाल्यास त्या सर्व रकमेचे दायित्व अभिकर्ता यांचे असेल. महानगरपालिके कडून अभिकर्त्यास देय असणार नाही असे स्पष्ट नमुद करावे.

मा.श्री. कांबळे र.द.:- संप, दंगल नैसार्गिंक अपत्ती अन्यथा कोणत्याही कारणासाठी जर ही सेवा बंद राहिली तर अभिकर्त्यास त्याच्या होणा-या नुकसान भरपाई साठी स्थायी समितीच्या निर्णयायास अधिन राहून कराराच्या मुदतीत वाढ करण्याबाबत विचार करण्यांत येईल. मात्र त्याबाबत महानगरपालिकेस कोणतीही प्रतिपूर्ती अभिकर्ता संस्थेस देणे अनुज्ञेय रहाणार नाही व बंधनकारक असणार नाही अशी अट नमुद करावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- अहमदनगर शहरातील प्रमुख मार्गावर दर पंधरा मिनिटाला एक बस सोडणे बंधन कारक करावे.

मा.श्री.गव्हाळेवि.ना.:-मा.शासनाचे निकषानुसार अभिकर्ता संस्थेस वाहनतळासाठी जागा देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाचे निकषानुसार जागा देण्यात येईल.

मा.श्री. पवार बा.रे.:- अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये संबधीत अधिनियमांचे अटी/ शर्तीचे उल्लंघन केल्यास संबंधीत अभिकर्त्यास एक महिन्याची आगावु नोटीस देण्यात येईल. या ऐवजी दोन महिन्याची आगावु नोटीस देण्यात येईल अशी अट नमुद करावी तसेच त्या नंतर कोणतीही सुधारणा न झाल्यास ही सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणणे बाबतचा अधिकार मा.आयुक्त यांचा असेल. मा.आयुक्त यांचे निर्णयाविरूध्द अभिकर्त्यास १५ ऐवजी ३० दिवसाचे आत मा.स्थायी समितीकडे अपील करता येईल. या प्रमाणे अटीची दुरूस्ती करण्यांत यावी.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- अभिकर्ता संस्थेने मा.आयुक्त साहेब यांना बससेवेचे करारनाम्या संबंधी आज दिनांक २९ एप्रिल २०१० रोजी पत्र दिलेले आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मा.सभेने आपल्या निर्णयानुसार ठराव पारित करावा.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेबः- अभिकर्ता संस्थेने दिलेल्या पत्रामधील मुद्दे वाचून दाखवितो.

**मुद्दा क्रमांक- 1 :-** Ser.No.4.--It is a well established fact that majority of City Services all over the world make losses. We find no reason to believe that the Ahmednagar Municipal Corporation will make profits atleast in near terms. There is no Justification for payment of royalty unless and until the Company is in a position to make reasonable profits. We can consider payment of reasonable amount royaliy after our Company makes profits. म्हणजे शहर बससेवा ही सर्व जगात तोटयात चालत आहे ही परिस्थीती आहे अशा परिस्थीतीत अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा नफ्मा मध्ये चालेल असे आम्हास वाटत नाही तसेच रॉयल्टी संदर्भात कंपनी योग्य तो नफा झाल्याशिवाय विचार करणार नाही म्हणजेच आम्ही कंपनीला नफा झालेनंतर योग्य ती रक्कम रॉयल्टी म्हणून देण्यास तयार आहे.

मा.सभापती साहेब :- अभिकर्ता संस्थेने किती ही बस सुरू केल्या. तरी त्यांचेकडून नाममात्र रूपये ५१,०००/- रॉयल्टी म्हणून घेण्यांत यावे. असे आपण ठरविलेले आहे.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेबः- **मुद्दा क्रमांक- 2 :-** Point No.6-- It will not be Possible for Company to offer concessions to any class of the Society for the reasons mentioned above. If the concessions are rcquited to be offered on select basis like student concession upto the age of 10th standard students, scnior citizens or other categories, the entire amount will have to be reimbursed by the Government / Ahmednagar Municipal Corporation म्हणजे दहावी पर्यत शिक्षण घेणारे विद्यार्थ्यी जेष्ठ नागरिक यांना आम्ही कोणतीही सवलत देवु शकणार नाही व सवलत देणे आवश्यक आहे. असे तुमचे मत पडल्यास त्या संदर्भात त्याची भरपाई अहमदनगर महानगरपालिकेस करावी लागेल.

मा.सभापती साहेबः- शासन निर्णयाप्रमाणे अंध,अपंग यांना बस वाहतुकीचे दरात सवलत देणे बंधनकारक राहिल याबाबत कुठल्याही स्वरूपाचा परतावा महानगरपालिकाकडून अभिकर्त्यास दिला जाणार नाही.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेबः- **मुद्दा क्रमांक- 3 :-** Point No.7-- It is not possible to bear the entire capital expenditure of buying the buses for our Company, Atleast 50% of the capital will have to be provided by Ahmednagar Municipal Corporation. the entire contents in this paragraph will have to be discussed and certain modifications considered. म्हणजे कंपनीस बसेस खरेदी करणे कामी सर्व रक्कम गुंतवावयाची किंवा खर्च करावयाची ( भाग भांडवल) कंपनीची इच्छा नाही. त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेने भाग भांडवल म्हणून 50% रक्कम घ्यावी लागेल.

मा.सभापती साहेब :- मुळ प्रस्तावामध्ये हा मुद्दा नसलने बस खरेदीसाठी महानगरपालिका अभिकर्ता संस्थेस भाग भांडवल देणार नाही. मुळ प्रस्तावामध्ये हा मुद्दा नव्हता.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेबः- **मुद्दा क्रमांक- 4 :-** Point No.13-- Ahmednagar Municipal Corporation. should provide following infrastructural facilities atleast 1 month before starting the services.

**a)** suitablc office accommodation of about 2,000 sg. ft for the City g.m. and his staff

**b)** Suitable land for locating bus terminals as may be required in the interest of travelling Public

**c )** Workshop shed of abour 5,000 sqft including some rooms for office

**d )** Central Bus Terminus at an appropriate place.

It is Kindly braught to your notice that the above investments are of permanent nature and the Concept of City services is perenial , whereas licence / contrat is rcstricted to specific period , it is therefore logical to expect the investment to bc made by Corporation. म्हणजे अहमदनगर महानगरपालिकेस सेवा सुरू होण्यापूर्वी खालील बाबींची पुर्तता करावी लागेल (अ) योग्य ती जागा अंदाजे 2000 स्केअर फुट नगर शहरात ऑफिस साठी व स्टाफ साठी उपलब्ध करून दयावी लागेल. (ब) सोयीस्कर अशी जागा बस टर्मिनल साठी द्यावी लागेल. (क) वर्कशॉपसाठी शेड अंदाजे 5000 स्केअर फुट त्यामध्ये खोल्या व ऑफिसेस यासाठी उपलब्ध करून द्यावी लागेल. (ड) सेंट्रल बस टर्मिनल साठी योग्य ती जागा (मध्यवर्ती बसस्थानक ) उपलब्ध करून द्यावी लागेल. वरील सर्व बाबींसाठी अहमदनगर महानगरपालिकेने खर्च करावा लागेल.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका मालकीची 5000 चौ. फूट जागा उपलब्ध असेल तेथे वर्कशॉपासाठी व वाहनतळासाठी 1000 चौरस फुट जागा आवश्यकते नुसार देणेत येईल शेड व खोल्याचे बांधकाम अभिकर्ता संस्थेने स्वत: करून घ्यावे.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेब:- **मुद्दा क्रमांक-5 :-** Point No.14--It is difficult to print the material as indicated in the para since advertisements will be made only by the Company No prior approval ishould be normally necessary.The information will be scnt to Ahmednagar Municipal Corporation periodically म्हणजे जाहिराती संदर्भात सर्व हक्क हे कंपनी कडे असतील कंपनी ज्या व्यक्ती अगर संस्थेची जाहिरात करेल त्या बदल निर्णय घेण्याचे अधिकार कंपनीस असतील. अहमदनगर महानगरपालिकेस त्याबाबत फक्त कळविले जाईल.

मा.सभापती साहेब :- बसेवर महानगरपालिकाची जाहिरात विनामुल्य लावण्यात यावी. या अटीचा समावेश बस सेवेचे अटी / शर्ती मध्ये करण्यांचे ठरलेले आहे.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेब:- **मुद्दा क्रमांक-6 :-**Point No.16-We do not agree for the control of the Standing Committee.The Company will lake instructions from the Commissioner or any other Officer of suitable rank appointed for the purpose The Company will have liaison only with the contact office This arrangement will prove to be most effective in long run and is in the interest of passangers who are our main customers.म्हणजे आम्ही स्थायी समितीच्या अधिकार खाली काम करण्यांस तयार नाही. कंपनी ही मा.आयुक्त अगर त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती बरोबर चर्चा करू व त्याच अधिका-या बरोबर फक्त आम्ही बोलणी करू.

मा.सभापती साहेब :- परिवहन समिती नियमानुसार गठीत होत नाही. तो पर्यत बससेवेवर मा.स्थायी समिती सभेचे नियंत्रण राहिल.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेब:- **मुद्दा क्रमांक- 7:-**Point No.19--This is not acceptable. म्हणजे ही अट कबुल नाही.

मा.सभापती साहेब:- अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये संबधीत अधिनियमाचे अटी / शर्तीचे उल्लंघन केल्यास संबंधीत अभिकर्त्यास एक महिन्याची आगाउ नोटीस देण्यात येईल. या ऐवजी दोन महिन्याची आगावू नोटीस देण्यात येईल अशी अट नमुद करावी तसेच त्या नंतर कोणतीही सुधारणा न झ ाल्यास ही सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणणे बाबतचा अधिकार मा.आयुक्त यांचा असेल.मा.आयुक्त यांचे निर्णयाविरूध्द अभिकर्त्यास १५ ऐवजी ३० दिवसाचे आत मा.स्थायी समितीकडे अपील करता येईल. या प्रमाणे अटीची दुरूस्ती करण्यांत यावी.

मा.उपायुक्त(कर) डॉ.श्री. जावळे साहेब:- **मुद्दा क्रमांक- 8 :-** Point No.21--This is not acceptable as a general rule but can bc discussed and spccifie rules can be prepared in this regard. म्हणजे ही अट कबुल नाही कारण त्या संदर्भात वेगळे नियम करण्यांत येतील.

मा.सभापती साहेब :- कोणत्याही नैसर्गिक कारण शिवाय बससेवा बंद ठेवल्यास या कालावधी साठी महानगरपालिकेचे भाडे / स्वामित्वधन चालु राहिल तसेच दंडनिय रक्कम म्हणून रूपये १००० प्रती दिन आकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचा राहिल व हे अभिकर्त्यास बंधनकारक राहिल. याप्रमाणे अट ठरविलेली आहे ती तशीच ठेवण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- महानगरपालिकेचे शहर वाहतुक बससेवेच्या अटी / शर्तीचे मसुदयास दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- महानगरपालिकेचे शहर वाहतुक बससेवेच्या अटी / शर्तीचे मसुदयास दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अटी / शर्तीचे मसुदयास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी बससेवे बाबतच्या अटी / शर्ती चे मसुदयांस मंजुरी मिळणेबाबतचे प्रस्तावावर व प्रसन्ना बस लिंक प्रा.लि. पुणे यांनी दिनांक २९ एप्रिल २०१० रोजी दिलेल्या शहर वाहतुक बस सेवेच्या अटी / शर्ती बाबत चे पत्रावर सभेमध्ये झालेल्या साध बाधक चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

*अहमदनगर महानगरपालिका परिवहन बससेवे चे बसेस वरील महानगरपालिकेच्या नांवापेक्षा अभिकर्ता संस्थेचा लोगो अथवा नांव हे २५% या प्रमाणात लहान असावे. प्रमाण चारास एक असे असावे.

*अभिकर्ता संस्थेकडून स्वामित्वधन / रॉयल्टी म्हणून नाममात्र दर आकारणेचे ठरलेले असल्याने त्यांनी किती ही बस सुरू केल्या तरी ही त्याचेकडून रूपये ५१,०००/-(एक्कावन्न हजार फक्त) स्वामित्वधन / रॉयल्टी म्हणून घेण्यात यावेत.

*अभिकर्ता संस्थेकडून बयाना रक्कम रूपये पन्नास हजार ऐवजी रूपये एक लाख व बँन्क गॅरंटी म्हणून रूपये पंचवीस लाख ऐवजी रूपये पन्नास लाख घेण्यात यावी. बँन्क गॅरंटी मधून कर्मचा-याचे वेतन अगर इतर कोणतीही देय्य रक्कम बँन्क गॅरंटी मधून दिली जाणार नाही.

*मा.शासन निर्णयाप्रमाणे अंध, अपंग व्यक्ती यांना बस वाहतुकीचे दरात सवलत देणे बंधन कारक राहिल याबाबत कुठल्याही स्वरूपाचा परतावा महानगरपालिकाकडून अभिकर्त्यास दिला जाणार नाही.

*महानगरपालिकेची जाहिरात बसेस वर विनामुल्य प्रदर्शित करणेत यावी.

*परिवहन सेवेसाठी नेमण्यात येणारे चालक व वाहक कर्मचा-यासाठी आर.टी.ओ. कडील चालक वाहकाचा परवाना बंधन कारक राहिल.

*अभिकर्त्यास नियमानुसार वेळेत सर्व बसेसचा विमा उतरविणे बंधन कारक राहिल सेवा कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारचा अपघात घडल्यास कर्मचारी अथवा प्रवासी अथवा कोणाचेही कोणतेही रक्कम देय असल्यास किंवा नुकसान भरपाई देणे बाबत आदेश झाल्यास त्या सर्व रकमेचे दायित्व अभिकर्ता त्यांचेच असेल सदर रक्कम अभिकर्ता यांचे स्तरावर विमा कंपनी मार्फत देखील देवु शकेल या बाबत महानगरपालिकेस कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय असणार नाही. महानगरपालिके कडून अभिकर्त्यास देय असणार नाही. असा समावेश करणेत यावा.

* संप, दंगल नैसर्गिक आपत्ती अन्यथा कोणत्याही कारणासाठी जर ही सेवा बंद राहिली तर अभिकर्त्यास त्यांच्या होणा-या नुकसान भरपाई साठी मा.स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहून कराराच्या मुदतीत वाढ करण्यांबाबत विचार करण्यांत येईल मात्र त्याबाबत कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय रहाणार नाही या अटी / शर्ती मध्ये बंधन कारक असणार नाही. असा समावेश करणेत यावा.

* अहमदनगर शहरातील प्रमुख मार्गावर दर पंधरा मिनीटाला एक बस सोडणे बंधन कारक असेल.

*अभिकर्ता संस्था यांना मा. शासनाचे निकषाप्रमाणे महानगरपालिकेची जागा उपलब्ध असेल तेथे वर्कशॉप साठी पाच हजार चौरस फूट जागा व वाहन तळासाठी एक हजार चौरस फूट जागा आवश्यकते नुसार देणेत येईल आवश्यकते नुसार शेड व ऑफिस खोल्याचे बांधकाम अभिकर्ता संस्थेने स्वखर्चाने करून घ्यावे.

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार परिवहन समिती जोपर्यत गठीत होत नाही तो पर्यत बससेवेवर मा.स्थायी समितीचे नियंत्रण राहिल.

*अभिकर्त्याने अन्य कोणत्याही वेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ किंवा मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये संबंधी अधिनियम चे अटी / शर्तीचे उल्लंघन केल्यास संबंधीत अभिकर्त्यास एक महिन्याची आगावु नोटीस देण्यात येईल या ऐवजी दोन महिन्याची आगावु नोटीस देण्यात येईल अशी अट नमुद करावी तसेच त्या नंतर कोणतीही सुधारणा न झाल्यास ही सेवा तात्काळ बंद करणे बाबत व करार संपुष्टात आणणे बाबतचा अधिकार मा.आयुक्त यांचा असेल. मा.आयुक्त यांचे निर्णया विरूध्द अभिकर्त्यास १५ ऐवजी ३० दिवसाचे आंत मा.स्थायी समिती कडे अपील करता येईल.

वरीलप्रमाणे अटी / शर्तीचा अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी बससेवेच्या अटी / शर्ती मध्ये समावेश करून अटी / शर्तीचे मसुदयास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा. श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका